महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

ईमेल - sakalyanpuneest@gmail.com

| | | |
|---|---|---|
| वाचा | १ | शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र-सकआ.२००१/प्रक्र. २५१/आस्था-२, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४. |
| | २ | सामान्य प्रशासन विभाग शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/ प्र. क्र. ३१२ A/ १६-ब, दिनांक २९ डिसेंबर २०१७ व दिनांक ७.५.२०२१ |
| | ३ | दिनांक १० ऑक्टोबर २०२३ रोजी झालेली विभागीय पदोन्नती समितीची बैठक. |

****************************************************************************************************

क्र.सकआ/आस्था-२/प्र-लि.-का. अ./पदोन्नती/२०२३-२४/पुणे/ ४४८२ दिनांक : १०.११.२०२३.

## -: आदेश :-

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आस्थापनेवरील मंजूर असलेल्या पदांचा आढावा वित्त विभागाच्या उच्चस्तरीय समितीने घेतला असून उपोद्घातातील संदर्भ क्र. २ च्या शासन पत्र व शासन निर्णयातील निर्देशानुसार पदोन्नती कोटयातील रिक्त असणारी पदे सेवा जेष्ठतेनुसार रिक्त पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. संदर्भ क्र. ३ च्या पदोनती समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार प्रमुख लिपिक संवर्गातून पदोन्नतीने **कार्यालय अधीक्षक** या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

पदोन्नती समितीने घेतलेल्या निर्णयानुसार **प्रमुख लिपिक** संवर्गातून वेतनश्रेणी वेतन बँड एस-१४ ३८६०० - १२२८०० या वेतनश्रेणीतील **कार्यालय अधीक्षक** पदावर खालील कर्मचाऱ्याचे तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करित आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यरत कार्यालयाचे नाव | पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती एल.एस भाकरे प्रमुख लिपिक | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय मुंबई शहर | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना. |
| २ | श्री.एस.सी. काळे, प्रमुख लिपिक | शिक्षण शाखा समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | **आस्थापना शाखा, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना. |
| ३ | श्री.वी.व्ही. पवार प्रमुख लिपिक | १००० मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्र. १ नाशिक | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ४ | श्री.टी.एस. तडवी, प्रमुख लिपिक | लेखापरिक्षण शाखा समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना. |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यरत कार्यालयाचे नाव | पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| ५ | श्री.व्ही.आर बाबन प्रमुख लिपिक | प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण कार्यालय लातूर विभाग लातूर | **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ६ | श्रीमती सी.डी. रसाळ प्रमुख लिपिक | नाहसं शाखा समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ७ | श्री.व्ही.के. शिंगाडे प्रमुख लिपिक | लेखापरिक्षण शाखा समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर** येथील कार्यालय अधीक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ८ | श्री.व्ही.के. भोईर प्रमुख लिपिक | प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण कार्यालय पुणे विभाग पुणे | **मावक / नाहसं शाखा, समाज कल्याण आयुकतालय, महाराष्ट्र राज्य, पुणे** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ९ | श्री.एम.डी. बडे प्रमुख लिपिक | १००० मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्र. २ नाशिक | **जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| १० | श्रीम. एस.डी. भुजबळ प्रमुख लिपिक | इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे | **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सिंधूदुर्ग** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| ११ | श्री.एस.डी. घुले प्रमुख लिपिक | १००० मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्र. १ औरंगाबाद | **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| १२ | श्री.आर.के. गाडे प्रमुख लिपिक | १००० मुला-मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्र. २ छत्रपती संभाजीनगर | **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, छत्रपती संभाजीनगर** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |
| १३ | श्रीमती व्ही.एच शिंदे प्रमुख लिपिक | आस्थापना शाखा, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. | **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, रत्नागिरी** येथील कार्यालय अधीक्षक या रिक्त पदावर पदोन्नतीने पदस्थापना |

उपरोक्त नमूद प्रमुख लिपिक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यालय अधीक्षक या पदावर खालील अटींच्या अधीन राहून पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

१. मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरची पदोन्नती ही वरील न्यायालयीन प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२. पदोन्नती आदेशातील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या पदावर हजर होणेस्तव हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पदोन्नतीच्या ठिकाणी रुजू व्हावे. संबधीत कर्मचाऱ्यांनी पदोन्नती नाकरल्यास पदोन्नतीचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच पदोन्नतीच्या पदावर रुजू न झाल्यास / पदोन्नती नाकारल्यास त्यांनी तात्काळ त्यांचे कार्यालयामार्फत आयुक्तालयास कळविण्यांत यावे व सदरहू आदेशान्वये पदोन्नती नाकारल्याची नोंद कार्यालय प्रमुख यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तकात घ्यावी.

३. ज्या कर्मचा-यांना कालबध्द/आश्वासित प्रगती योजनेचा फायदा मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचा-यांनी त्वरीत पदावर रुजू व्हावे. त्यांनी पदोन्नती नाकारल्यास अथवा रुजू न झाल्यास त्याचे फायदे आपोआपच रद्द होतील.

४. पदोन्नतीच्या पदावर रुजू झाल्यानंतर वेतन निश्चितीच्या दृष्टीने एक महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील. तसे विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम क्र. ११ (१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

५. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/ प्रक्र ३०३/ का-१२ दिनांक १२.९.२०१६ नुसार पदोन्नती नाकारल्यास त्याचा तिसऱ्या वर्षी पदोन्नतीसाठी विचार केला जाईल याची नोंद घ्यावी.

६. संबधित कार्यालय प्रमुख यांनी पदोन्नती झालेल्या कर्मचा-याकडील कार्यभार अन्य कर्मचाऱ्यांकडे सोपवून त्यांना तात्काळ पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे व कार्यमुक्त / रुजू अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी आयुक्तालयास त्वरीत सादर करावा.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

10-11-23

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर</u>.

१. मा. सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
२. महालेखापाल, मुंबई / नागपूर.

<u>प्रत माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.</u>

१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, संबंधीत.
२. अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण आयुकतालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. शाखा प्रमुख, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग (सर्व)
५. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण (संबंधित)
६. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद, (संबंधित)
७. गृहप्रमुख, १००० मुला/मुलींचे शासकीय वसतिगृह (संबंधित)
८. कोपागार अधिकारी (संबंधित)
९. संबंधित कर्मचारी.